**"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेतील सुधारणाबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग.**
**शासन निर्णय क्रमांक- मबावि २०२४/प्र.क्र.९६/कार्या-२,**
नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:-०३ जुलै, २०२४.

**संदर्भ:-** महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र.मबावि २०२४/प्र.क्र.९६/कार्या-२, दि.२८.०६.२०२४.

**प्रस्तावना :-**

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजना सुरु करण्याबाबत महिला व बाल विकास विभागाने सादर केलेल्या प्रस्तावास दि.२८.०६.२०२४ रोजीच्या मा.मंत्रीमंडळ बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यात "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" योजना सुरु करण्यास शासन निर्णय दि.२८.०६.२०२४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामधील नमूद काही निकषांमध्ये सुधारणा करण्याची बाब, तसेच सदर जिल्हास्तर समितीमध्ये सुधारणा करण्याची बाब विचाराधीन होती. त्यानुषंगाने मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली "मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेबाबत चर्चा करण्यासाठी दि.०२.०७.२०२४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये “मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण” या योजनेच्या दि.२८.०६.२०२४ रोजीच्या शासन निर्णयामध्ये अंशत: सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय :-**

"मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण" या योजनेच्या शासन निर्णय दि.२८.०६.२०२४ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:-

**अ) योजनेचे लाभार्थी, पात्रता, अपात्रता व आवश्यक कागदपत्रे:-**

| अ.क्र. | शासन निर्णय दि.२८.०६.२०२४ रोजीच्या परिच्छेद क्र.१ मधील नमूद निकष | शासन निर्णयामध्ये दुरुस्ती |
|---|---|---|
| १. | **३. योजनेचे लाभार्थी:-** महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६० या वर्ष वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला. | **३. योजनेचे लाभार्थी:-** महाराष्ट्र राज्यातील २१ ते ६५ या वर्ष वयोगटातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटूंबातील केवळ एक अविवाहित महिला. |
| २. | **४. योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता :-** | **४. योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता :-** |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | अ.क्र. (२) राज्यातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला. | अ.क्र. (२) राज्यातील विवाहित, विधवा, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला तसेच त्या कुटूंबातील केवळ एक अविवाहित महिला. |
| ३. | **४. योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता :-**<br>अ.क्र. (३) किमान वयाची २१ वर्षे पूर्ण व कमाल वयाची ६० वर्ष पूर्ण होईपर्यंत. | **४. योजनेच्या लाभार्थ्यांची पात्रता :-**<br>अ.क्र. (३) किमान वयाची २१ वर्षे पूर्ण व कमाल वयाची ६५ वर्ष पूर्ण होईपर्यंत. |
| ४. | **५. अपात्रता :-**<br>अ.क्र. (३) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी/कंत्राटी कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत. परंतु बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले तथा स्वयंसेवी कामगार आणि कर्मचारी अपात्र ठरणार नाहीत. | **५. अपात्रता :-**<br>अ.क्र. (३) ज्यांच्या कुटुंबातील सदस्य नियमित/कायम कर्मचारी म्हणून सरकारी विभाग/उपक्रम/मंडळ/भारत सरकार किंवा राज्य सरकारच्या स्थानिक संस्थेमध्ये कार्यरत आहेत किंवा सेवानिवृत्तीनंतर निवृत्तीवेतन घेत आहेत. तथापि, रु.२.५० लाखापर्यंत उत्पन्न असलेले बाह्य यंत्रणाद्वारे कार्यरत असलेले कर्मचारी, स्वयंसेवी कामगार आणि कंत्राटी कर्मचारी पात्र ठरतील. |
| ५. | **५. अपात्रता :-**<br>अ.क्र. (४) सदर लाभार्थी महिलेने शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनेव्दारे रु.१,५००/- पेक्षा जास्त लाभ घेतला असेल. | **५. अपात्रता :-**<br>अ.क्र. (४) सदर लाभार्थी महिलेने शासनाच्या इतर विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या आर्थिक योजनेव्दारे दरमहा रु.१,५००/- किंवा त्यापेक्षा जास्त रक्कमेचा लाभ घेत असेल. |
| ६. | **५. अपात्रता :-**<br>अ.क्र. (७) ज्यांच्या कुटुंबातील सदस्यांची संयुक्तपणे पाच एकरपेक्षा जास्त शेतजमीन आहे. | **५. अपात्रता :-**<br>अ.क्र. (७) येथिल अपात्रतेची अट वगळण्यात येत आहे. |
| ७. | **६.सदर योजनेमध्ये लाभ मिळण्याकरिता खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहेत:-**<br>अ.क्र. (३) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र/महाराष्ट्र राज्यातील जन्म दाखला. | **६. सदर योजनेमध्ये लाभ मिळण्याकरिता खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहेत:-**<br>अ.क्र. (३) महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र (लाभार्थी महिलेकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसेल तर त्याऐवजी त्या महिलेचे १५ वर्षापूर्वीचे (१) रेशनकार्ड, (२) |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | | मतदार ओळखपत्र, (३), शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र व (४) जन्म दाखला या ४ पैकी कोणतेही ओळखपत्र/प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येणार आहे.)<br>(परराज्यात जन्म झालेल्या महिलेने महाराष्ट्रातील अधिवास असणाऱ्या पुरुषाबरोबर विवाह केला असेल तर अशा बाबतीत त्यांच्या पतीचे (१) जन्म दाखला किंवा (२) शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा (३) अधिवास प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात यावे.) |
| ८. | **६.सदर योजनेमध्ये लाभ मिळण्याकरिता खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहेत:-**<br>अ.क्र. (४) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापर्यंत असणे अनिवार्य). | **६. सदर योजनेमध्ये लाभ मिळण्याकरिता खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहेत:-**<br>अ.क्र. (४) सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न रु.२.५० लाखापर्यंत असणे अनिवार्य आहे. तथापि, पिवळे व केशरी रेशन कार्ड धारकांना उत्पन्नाच्या दाखला प्रमाणपत्रातून सूट देण्यात येत आहे.). |

**ब) समिती:-**

"मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण" या योजनेचे संनियत्रंण व आढावा घेण्याकरिता राज्यस्तरावर व जिल्हास्तर समिती गठीत करण्यात आली आहे. सदर जिल्हास्तर समितीमध्ये जिल्हाधिकारी हे सदर समितीचे अध्यक्ष आहे. सदर समितीमध्ये अंशत: बदल करुन संबंधित जिल्हयाचे पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तर समिती गठीत करण्यात येत आहे.

**जिल्हास्तर समिती:-**

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पदनाम |
|---|---|---|
| १ | संबंधित जिल्हयाचे पालकमंत्री | अध्यक्ष |
| २ | संबंधित जिल्हयाचे मंत्री | सह अध्यक्ष |
| ३ | संबंधित सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | सदस्य |
| ४ | संबंधित पोलिस अधिक्षक | सदस्य |
| ५ | जिल्हा सह आयुक्त नगर प्रशासन | सदस्य |
| ६ | जिल्हयातील महानगरपालिकाचे आयुक्त किंवा त्यांचे प्रतिनिधी (उप आयुक्त दर्जापेक्षा कमी | सदस्य |



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | नसावे.) | |
| ७ | संबंधित जिल्हा कार्यक्रम अधिकारी | सदस्य |
| ८ | जिल्हयातील नगरपरिषदांचे मुख्याधिकारी | सदस्य |
| ९ | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास प्रकल्प | सदस्य |
| १० | संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी | सदस्य |
| ११ | संबंधित जिल्हाधिकारी | सदस्य सचिव |

सदर समितीची बैठक दरमहा तसेच आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात यावी. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-

(१) सदर योजनेची देखरेख व संनियंत्रण करणे.
(२) सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत नियमित आढावा घेणे.
(३) सदर योजनेसाठी उपलब्ध तरतूद व खर्च याबाबतचा आढावा घेवून आवश्यक निधीची मागणी राज्यस्तरीय समितीकडे सादर करणे.
(४) कालबध्द पध्दतीने पात्र लाभार्थीची यादी अंतिम करणे व सदर योजनेपासून कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेणे.

**क) तालुकास्तर समिती:-**

तालुका स्तरावर खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे:-

| अ.क्र. | पदनाम | समितीमधील पदनाम |
|---|---|---|
| १ | अशासकीय सदस्य | अध्यक्ष |
| २ | मुख्याधिकारी, नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत | सदस्य |
| ३ | गट विकास अधिकारी | सदस्य |
| ४ | सहायक आयुक्त/सहायक अधिकारी, समाज कल्याण | सदस्य |
| ५ | सहाय्यक प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य |
| ६ | बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण) (ज्येष्ठतम) | सदस्य |
| ७ | एक अंगणवाडी पर्यवेक्षिका (बा.वि.प्र. यांच्या मान्यतेने) | सदस्य |
| ८ | संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) | सदस्य |
| ९ | दोन अशासकीय सदस्य | सदस्य |
| १० | संबंधित तहसिलदार | सदस्य सचिव |

सदर समितीमध्ये ३ अशासकीय सदस्य असतील. त्यामधील एक अध्यक्ष राहतील. सदर समितीच्या अध्यक्षांची व इतर २ अशासकीय सदस्याची निवड सदर जिल्हयांच्या पालकमंत्री यांच्यामार्फत करण्यात येईल.

सदर समितीची बैठक दरमहा तसेच आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात यावी. सदर समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील:-

(१) सदर योजनेची देखरेख व संनियंत्रण करणे.
(२) सदर योजनेच्या अंमलबजावणीबाबत नियमित आढावा घेणे.



Scanned with OKEN Scanner

(३) सदर योजनेपासून कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता घेणे.

(४) ग्रामीण स्तरावर प्राप्त झालेल्या अर्ज, त्यांची छाननी/तपासणी करणे, सदर अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांची पडताळणी करणे.

**<u>ड) योजनेच्या अंमलबजावणीसाठी कालमर्यादा:-</u>**

उपरोक्त कालावधीनंतर या मोहिमेतंर्गत नोंदणीबाबतच्या कार्यवाहीसंदर्भात वेळोवेळी आवश्यक त्या सूचना देण्यात येतील, याबाबत खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे:-

"सदर योजनेत आता दि.३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत लाभार्थी महिलांना अर्ज करता येईल. तसेच दि.३१ ऑगस्ट, २०२४ पर्यंत अर्ज करण्यात आलेल्या लाभार्थी महिलांना दि.०१ जुलै, २०२४ पासून दरमहा रु.१,५००/- आर्थिक लाभ देण्यात येणार आहे. या मोहिमेतंर्गत नोंदणीबाबतच्या कार्यवाहीसंदर्भात वेळोवेळी आवश्यक त्या सूचना देण्यात येतील."

**<u>इ) प्रोत्साहन भत्ता:-</u>**

सदर योजनेतंर्गत मोबाईल ॲपव्दारे ऑनलाईन अर्ज सादर करण्यासाठी अंगणवाडी सेविका यांना लाभार्थ्यांची अंतिम यादी प्रसिध्द झाल्यावर, एकूण पात्र लाभार्थ्याचे अर्ज सादर केल्याप्रमाणे प्रति पात्र लाभार्थी रु.५०/- याप्रमाणे प्रोत्साहन भत्ता देण्यात येईल.

२. सदर शासन निर्णय दि.०२.०७.२०२४ रोजीच्या मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२४०७०३१७३५११४३३० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANUP
KUMAR
YADAV

Digitally signed by ANUP KUMAR YADAV
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=[illegible], postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=[illegible], cn=ANUP KUMAR YADAV
Date: 2024.07.03 17:21:06 +05'30'

**(डॉ.अनुपकुमार यादव)**
**सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.अध्यक्ष/उपाध्यक्ष/सदस्य, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई,
६. मा.मंत्री, महिला व बाल विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. मा.मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई,



Scanned with OKEN Scanner

९. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०. सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. विभागीय आयुक्त (सर्व),
१२. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे,
१३. जिल्हाधिकारी (सर्व),
१४. महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर,
१५. महालेखापाल - महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा), मुंबई / नागपूर,
१६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१८. सह सचिव, उपसचिव, अवर सचिव महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,
१९. सर्व सह आयुक्त/उप आयुक्त / विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे,
२०. सर्व विभागीय उपआयुक्त, महिला व बाल विकास (आयुक्तालय पुणे मार्फत),
२१. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी (आयुक्तालय पुणे मार्फत),
२२. महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई (सर्व कार्यासने),
२३. निवड नस्ती, कार्यासन-२



Scanned with OKEN Scanner